**भारतीय रिझर्व्ह बँक**

**RESERVE BANK OF INDIA**

www.rbi.org.in

आरबीआय/2016-2017/16

डीपीएसएस.सीओ.पीडी.पीपीआय.क्र.01/02.14.006/2016-17 जुलै 01, 2016

सर्व पूर्वदत्त प्रदान संलेख देणारे, सिस्टिम प्रोव्हायडर्स,
सिस्टिममध्ये भाग घेणारे, आणि इतर सर्व, भावी पूर्वदत्त प्रदान संलेखे देणारे.

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - भारतामध्ये पूर्वदत्त प्रदान संलेख (प्रि.पेड पेमेंट इन्स्ड्रुमेंट्स) देण्यावरील व कार्यरीतीवरील धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे**

आपणास माहितच आहे की, भारतामधील प्रिपेड पेमेंट इंस्ड्रुमेंट्स देणे व कार्यरीती ह्यावरील धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे असलेली परिपत्रके, रिझर्व्ह बँक, वेळोवेळी देत आली आहे. प्रिपेड पेमेंट संलेख देणारे, सिस्टिम प्रोव्हायडर्स, सिस्टिममध्ये भाग घेणारे व भावी प्रिपेड पेमेंट संलेख देणारे ह्यांच्यासाठी, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात, ह्यासाठी हे महापरिपत्रक तयार करण्यात आले आहे.

2. भारतामध्ये प्रिपेड पेमेंट संलेख देणे व कार्यरीती ह्यावरील, जुलै 09, 2015 पर्यंतच्या सर्व सूचना/मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करुन हे महापरिपत्रक अद्यावत करण्यात आले असून ते आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे. ह्या महापरिपत्रकात संदर्भित परिपत्रकांची यादी **परिशिष्टामध्ये** दिली आहे.

आपली विश्वासु ,

(नंदा दवे)

मुख्य महाव्यवस्थापक

**अनुक्रमणिका**


| परिच्छेद क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| (अ) | उद्देश | 3 |
| (ब) | वर्गीकरण | 3 |
| (क) | एकत्रित केलेली पूर्वीची मार्गदर्शक तत्वे | 3 |
| (ड) | व्याप्ती | 3 |
| (ई) | रचना | 3-18 |
| 1. | प्रस्तावना | 4 |
| 2. | व्याख्या | 4-5 |
| 3. | प्रिपेड पेमेंट संलेख देण्यासाठी अर्हता | 5-6 |
| 4. | सूट | 6 |
| 5. | भांडवली आवश्यकता | 6 |
| 6. | मनी लॉंडरिंग (केवायसी/एएमएल/सीएफटी) विरुध्द सुरक्षा उपाय | 6-7 |
| 7. | प्रिपेड पेमेंट संलेखांचे वर्ग | 7-12 |
| 8. | गोळा केलेल्या पैशाचा विनियोग | 12-16 |
| 9. | प्रिपेड पेमेंट संलेख देणे व रिलोड करणे | 16-17 |
| 10. | वैधता | 17 |
| 11. | व्यवहारांच्या मर्यादा | 17-18 |
| 12. | विमोचन | 18 |
| 13. | फसवणुकी टाळणे व सुरक्षा मानके | 18 |
| 14. | ग्राहक संरक्षणाचे प्रश्न | 18-19 |
| | एस्क्रो खात्यातील शेल्लकेवरील, ऑडिटरने द्यावयाच्या तिमाही प्रमाणपत्राचा नमुना | 20-21 |
| | परिशिष्ट | 22-23 |

**(अ) उद्देश**

देशामधील, प्रिपेड पेमेंट संलेख (पीपीआय) देण्याचे काम करणा-या व्यक्तींबाबत विनियम व पर्यावेक्षण ह्यासाठी एक साचा उपलब्ध करुन देणे आणि प्रदान व तडजोड प्रणालीच्या ह्या विभागाचा विकास सुजाणपणाने व ग्राहक स्नेही पध्दतीने करणे. ह्या मार्गदर्शक तत्वांबाबत, व्यक्ती व संस्था ही संज्ञा, प्रिपेड पेमेंट संलेख देणा-या संस्था, आणि प्रिपेड पेमेंट संलेख देण्याचे प्रस्तावित करणा-या संस्था ह्यांच्या संदर्भात वापरली आहे.

**(ब) वर्गीकरण**

प्रदान व तडजोड प्रणाली अधिनियम, 2007 (2007 चा 51) च्या कलम 10(2) सह वाचित, कलम 18 खाली, रिझर्व्ह बँकेने दिलेली मार्गदर्शक तत्वे.

**(क) पूर्वीच्या मार्गदर्शक तत्वांचे एकत्रीकरण**

ह्या महापरिपत्रकात, परिशिष्टामध्ये दिल्यानुसार, भारतामध्ये प्रिपेड पेमेंट संलेख देणे व कार्यकृती करणे ह्यावर दिली गेलेली धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे एकत्रित करण्यात आली आहेत.

**(ड) व्याप्ती**

देशामध्ये प्रिपेड पेमेंट संलेख देण्याचा व्यवसाय करणा-या, प्रदान प्रणाली चालकांसाठीचे अर्हता निकष व पायाभूत अटी ह्या मार्गदर्शक तत्वांमध्ये दिल्या आहेत. ह्या देशामध्ये, प्रदान प्रणालींचे चालन करण्यास आणि प्रिपेड पेमेंट संलेख देण्यास प्राधिकृत असलेल्या सर्व व्यक्तींनी, ह्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. प्रदान प्रणालींचे चालन करु इच्छिणा-या, आणि प्रिपेड पेमेंट संलेख देण्यामध्ये कार्यरत असणा-या सर्व व्यक्तींनी, प्रदान व तडजोड प्रणाली अधिनियम, 2007 खाली, रिझर्व्ह बँकेच्या, प्रदान व तडजोड विभागाकडून त्याबाबत प्राधिकृतता घेणे आवश्यक आहे.

**(ई) रचना**

(1) प्रस्तावना

(2) व्याख्या

(3) पीपीआय देण्यासाठी अर्हता

(4) सूट

(5) भांडवली आवश्यकता

(6) मनी लॉंडरिंग (केवायसी/एएमएल/सीएफटी) तरतुदीं विरुध्द सुरक्षा

(7) प्रिपेड पेमेंट संलेखांचे वर्ग

(8) गोळा केलेल्या पैशांचा विनियोग

(9) प्रिपेड पेमेंट संलेख देणे व रिलोड करणे

(10) वैधता

(11) व्यवहार मर्यादा

(12) विमोचन

(13) फसवणुक टाळणे व सुरक्षा मानके

(14) ग्राहक संरक्षणाचे प्रश्न

**(1) प्रस्तावना**

1.1 प्रदान व तडजोड प्रणाली अधिनियम, 2007 पारित झाल्यानंतर, बँका व अ-बँकीय संस्थांनी, रिझर्व्ह बँकेकडून मंजुरी/प्राधिकृतता घेऊन, ह्या देशात, प्रिपेड पेमेंट संलेख देणे, आणि ह्या बाबतीत रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे सुरु केले आहे. ह्या क्षेत्रामधील विकास, आणि पीपीआय देणारांची प्रगती विचारात घेऊन पीपीआय देणे व कार्यवाही करणे ह्यावरील एप्रिल 2009 मध्ये दिलेली सुरुवातीची मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी सुधारित करण्यात आली आहेत. मागील काळातील सुधारणांची संख्या पाहता सर्व सूचना एकाच जागी दिल्या जाणे आवश्यक झाले आहे.

1.2 ह्याशिवाय, पीपीआयच्या कार्यवाही संबंधाने, पीपीआय चालकांकडून मिळालेल्या संदर्भाचा विचार करुन, ग्राहकांशी सल्लामसलत केल्यानंतर, विद्यमान मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे पुनरावलोकनही करण्यात आले आहे. बँका व अ-बँकीय व्यक्ती दोन्हींचा समावेश असलेल्या ह्या मार्गदर्शक तत्वांमध्ये, अशा पेमेंट प्रणाली, ह्या देशात चालविण्यासाठीचे पात्रता निकष व अटी दिलेल्या आहेत.

**(2) व्याख्या**

2.1 **देणारा/प्रचालक** : व्यक्ती/संस्थांना, प्रिपेड पेमेंट संलेख देण्याच्या प्रणाली चालविणा-या व्यक्ती. अशा प्रकारे गोळा केलेला पैसा, ह्या व्यक्तींद्वारे, प्रत्यक्षपणे किंवा एखाद्या तडजोड-व्यवस्थेमार्फत, स्वीकारण्याची व्यवस्थाच असलेल्या व्यापा-यांना प्रदान करण्यासाठी वापरला जातो.

2.2 **धारक :** वित्तीय सेवांसह, माल व सेवा विकत घेण्यासाठी, प्रिपेड प्रदान संलेख मिळविणा-या व्यक्ती/संस्था.

2.3 **प्रिपेड प्रदान संलेख :** प्रिपेड प्रदान संलेख म्हणजे, अशा संलेखांवर निर्देशित केलेल्या मूल्याच्या विरुध्द, निधी हस्तांतरणासह, माल व सेवा ह्यांची खरेदी करण्यास साहय करणारे प्रदान संलेख. अशा संलेखांवर साठविलेले/निर्देशित केलेले मूल्य, हे एखाद्या क्रेडिट कार्डद्वारे किंवा बँक खात्यामधील डेबिट द्वारे किंवा रोख रकमेने, संलेख धारकाने प्रदान केलेले मूल्य असते. असे प्रिपेड संलेख, स्मार्ट कार्डस, मॅग्नेटिक स्ट्राईप कार्डस,

मोबाईल वॉलेट्स, कागदावरील पावत्या, आणि प्रिपेड रक्कम मिळविण्यासाठी वापरता येणा-या कोणत्याही संलेखाद्वारे (ह्यानंतर ह्यांना एकत्रितपणे प्रिपेड प्रदान संलेख म्हणण्यात आले आहे) दिले जाऊ शकतात. ह्या देशात दिल्या जाऊ शकणा-या प्रिपेड प्रदान संलेखांचे वर्गीकरण तीन वर्गात केले गेले आहे (1) क्लोज्ड सिस्टिम प्रदान संलेख (2) सेमी-क्लोज्ड सिस्टिम प्रदान संलेख आणि (3) ओपन सिस्टिम प्रदान संलेख.

2.4 **क्लोज्ड सिस्टिम प्रदान संलेख :** हे संलेख, एखाद्या व्यक्तीने, त्याच्या/तिच्याकडून माल व सेवा विकत घेण्यास मदत करण्यासाठी दिलेले प्रदान संलेख आहेत. ह्या संलेखांबाबत रोख रक्कम काढण्यास किंवा विमोचन करण्यास परवानगी नाही. ह्या संलेखांमुळे, तृतीय पक्षासाठी, रोकड काढणे किंवा विमोचन करण्यास साह्य होत नसल्या कारणाने, अशा संलेखांचे देणे व कार्यवाही करणे हे, प्रदान प्रणालींमध्ये वर्गीकृत केले जात नाही.

2.5 **सेमी-क्लोज्ड सिस्टिम संलेख :** संलेख देणाराबरोबर, ह्यांचे, असे प्रदान संलेख स्वीकारण्याबाबत विशिष्ट करार करण्यात आले आहेत अशा, स्पष्ट ओळख असलेल्या व्यापारी जागा/संस्थांमधून, वित्तीय सेवांसह, माल व सेवा खरेदी करण्यासाठी वापरता येऊ शकणारे प्रदान संलेख. ह्या संलेखांबाबत, धारकाला रोख रक्कम काढण्याची किंवा विमोचन करण्याची परवानगी नाही.

2.6 **ओपन सिस्टिम प्रदान संलेख :** कार्ड स्वीकारणा-या कोणत्याही व्यापारी जागांमधून (पॉईंट ऑफ सेल टर्मिनल्स), निधी हस्तांतरणा ह्यासारख्या वित्तीय सेवांसह, माल व सेवा विकत घेण्यासाठी, वापरता येऊ शकणारे प्रदान संलेख. ह्यांच्याद्वारे, एटीएम/बीसी इत्यादि ठिकाणी रोख रक्कम काढण्यासही परवानगी आहे.

2.7 **मर्यादा:** ह्या मार्गदर्शक तत्वात निर्देश केलेल्या संलेखांच्या मूल्यामधील मर्यादा, कोणत्याही धारकाला देता येऊ शकणा-या अशा संलेखांची कमाल किंमत/मूल्य दर्शविते.

2.8 **व्यापारी :** म्हणजे, माल व सेवा ह्यांच्या विक्रीविरुध्द, पीपीआय देणाराने दिलेले पीपीआय स्वीकारणा-या संस्था,

**3. प्रिपेड प्रदान संलेख (पीपीआय) देण्यासाठी पात्रता**

3.1 पात्रतेचे हे निकष पूर्ण करणा-या बँकांना, सर्व प्रकारचे प्रिपेड प्रदान संलेख देण्यास परवानगी आहे.

3.2 तथापि, रिझर्व्ह बँकेने, ज्यांना, मोबाईल बँकिंग व्यवहार उपलब्ध करण्यास परवानगी दिली आहे, त्याच बँकांना, मोबाईल आधारित प्रिपेड प्रदान संलेख (मोबाईल वॉलेट्स व मोबाईल खाती) सुरु करण्यास परवानगी दिली जाईल.

3.3 अबँकीय वित्तीय कंपन्या (एनबीएफसी) आणि इतर व्यक्तींना, मोबाईल फोन आधारित प्रिपेड प्रदान संलेखांसह?, केवळ? क्लोजड व सेमी क्लोजड प्णाली प्रदान संलेख देण्यासच परवानगी आहे?

**4. सूट**

4.1 **विदेशी मुद्रा प्रिपेड प्रदान संलेख :** विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम (फेमा) खाली, विदेशी मुद्रा प्रिपेड प्रदान संलेख देण्यास प्राधिकृत असलेल्या, आणि रिझर्व्ह बँकेने प्राधिकृत केलेल्या प्रदान प्रणालींचा एक सहभागी म्हणून त्या व्यक्ती असे संलेख देत आहेत, अशा व्यक्तींना ह्या मार्गदर्शकातील व्याप्तींमधून सूट देण्यात आली आहे. अशा प्रदान संलेखांचा वापर परवानगीप्राप्त चालु खात्यातील व्यवहारांपुरताच, मर्यादित असेल व त्यासाठी, वेळोवेळी सुधारित विदेशी मुद्रा व्यवस्थापन (चालु खाते व्यवहार) नियम 2000 खाली विहित केलेल्या अटी लागु होतील.

**5. भांडवली आवश्यकता**

5.1 रिझर्व्ह बँकेने, वेळोवेळी, कॅपिटल अॅडेक्वसीच्या विहित केलेल्या आवश्यकतांचे पालन करणा-या बँकांना व अबँकीय वित्तीय कंपन्यांना, प्रिपेड प्रदान संलेख देण्यास परवानगी आहे.

5.2 ह्यापुढे प्राधिकृतता मिळविण्यास इच्छुक अशा सर्व व्यक्तींसाठी, सर्व वेळी, किमान रु.500 लाख भरणा भांडवल आणि किमान रु.100 लाख धन निव्वळ मूल्य असणे आवश्यक आहे. वाढीव भांडवली आवश्यकतांबाबत, विद्यमान पीपीआय देणारांसाठी आवश्यक त्या सूचना वेगळ्याने अधिसूचित केल्या जातील.

5.3 एफडीआय/एफआयआय असलेल्या अर्जदार कंपन्यांनी, भारत सरकारच्या एकत्रिकृत एफडीआय धोरण मार्गदर्शक तत्वांखाली लागु असलेल्या किमान भांडवली अपेक्षा पूर्ण करणे आवश्यक आहे.

5.4 केवळ भारतात सुसंस्थापित झालेल्या कंपन्याच प्राधिकृततेसाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

**6. मनी लॉंडरिंग (केवायसी/एएमएल/सीएफटी) तरतुदीं विरुध्द सुरक्षा उपाय**

6.1 भारतीय रिझर्व्ह बँकेने, तुमचा ग्राहक जाणा/अँटी मनी लॉंडरिंग/दहशतवादाच्या अर्थसहाय्याशी सामना, ह्यावर वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे, त्यामधील बदल/सुधारणांसहित, प्रिपेड प्रदान संलेख देणा-या व्यक्तींना लागु होतील.

6.2 पीपीआय देणारे, एक प्रदान प्रणाली चालवत असल्याकारणाने, वेळोवेळी सुधारित केलेला प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग अधिनियम, 2002 आणि त्याखाली, तयार केलेले नियमही, पीपीआय देणारांना लागु होतात. ह्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन केले जात असल्याची खात्री करण्यासाठी, आवश्यक त्या प्रणाली ठेवल्या जाव्यात.

6.3 ह्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 4.1 मधील प्रदान संलेख सोडल्यास, सरहद्दीपलिकडील व्यवहारांसाठी प्रिपेड प्रदान संलेखांचा उपयोग करण्यास परवानगी नाही.

6.4 प्रिपेड प्रदान संलेख देणा-या व्यक्तींनी, ह्या संलेखांचा उपयोग करुन केलेल्या सर्व व्यवहारांची नोंद ठेवावी. ही माहिती, रिझर्व्ह बँक किंवा रिझर्व्ह बँकेने सुचविलेल्या कोणत्याही प्रतिनिधीला/प्रतिनिधींना छाननीसाठी उपलब्ध करुन द्यावी. ह्या व्यक्तींनी, फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट-इंडिया (एफआययु - आयएनडी) कडे शंकास्पद व्यवहार अहवालही (एसटीआर) सादर करावा.

**7. प्रिपेड प्रदान संलेखांचे वर्ग**

7.1 कोणत्याही प्रिपेड प्रदान संलेखाचे कमाल मूल्य (जेथे विशिष्ट मर्यादा विहित केलेली नाही परिच्छेद 10.2 अनुसार हस्तांतरित केलेल्या रकमेसह) रु.50,000 पेक्षा अधिक असणार नाही.

7.2 पुढे दिल्याप्रमाणे, ग्राहकाबाबतच्या ड्यु डिलिजन्सनंतर पुढील प्रकारचे <u>सेमी-क्लोज्ड प्रिपेड प्रदान संलेख</u> देता येऊ शकतील

(1) ग्राहकासंबंधीची किमान माहिती स्वीकारुन, रु.10,000/- पर्यंत - मात्र अशा बाबतीत, कोणत्याही वेळी येणे असलेली रक्कम रु.10,000/- पेक्षा अधिक नसावी, आणि कोणत्याही एखाद्या महिन्यात, रिलोड केलेले मूल्य रु.10,000/- पेक्षा अधिक नसावे. असे संलेख केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरुपातच दिले जाऊ शकतात.

(2) वेळोवेळी सुधारित केलेले पीएमएल नियम, 2005 च्या, नियम 2(ड) खाली व्याख्या केलेले अधिकृत रीत्या वैध असलेले कागदपत्र स्वीकारुन,रु.10,001/- ते रु.50,000/- पर्यंत. असे पीपीआय केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरुपातच दिले जाऊ शकतात आणि ते पुनर्भारित करता न येणा-या स्वरुपात असावेत.

(3) संपूर्ण केवायसी केल्यानंतर, रु.100,000 व रिलोडेबल स्वरुपाचा असावा. त्या पीपीआयमधील शिल्लक, कोणत्याही वेळी रु.100,000 पेक्षा अधिक असू नये.

(7.3) वर दिलेल्या सेमी क्लोज्ड पीपीआय व्यतिरिक्त, संपूर्ण केवायसी केल्यावर, बँका, ओपन प्रिपेड प्रदान संलेख देऊ शकतात.

(7.4) <u>को-ब्रँडेड प्रिपेड प्रदान संलेख</u>
प्रिपेड प्रदान संलेख देण्यासाठी प्राधिकृतता/मंजुरी मिळालेल्या सर्व व्यक्तींना, ज्यांच्या ग्राहकांसाठी/लाभार्थींसाठी असे को-ब्रँडेड संलेख दिले जात आहेत, अशा वित्तीय संस्थांच्या/सरकारी संस्थांच्या नावां/लोगोंसह असे संलेख देण्यास

परवानगी आहे. देणा-याचे नाव, त्या प्रदान संलेखावर ठळकपणे दर्शविलेले असेल. असे को-ब्रँडेड प्रिपेड प्रदान संलेख देऊ इच्छिणा-या एनबीएफसी/इतर संस्थांनी, त्यासाठी, रिझर्व्ह बँकेकडून एकदाच मंजुरी मिळवावी.

तथापि, परिपत्रक आरबीआय/2012-13/325.डीबीओडी.एफ़एसडी.बीसी.67/24.01.019/2012-13 दि. डिसेंबर 12, 2012 मध्ये दिलेल्या अटी व शर्तींवर, रुपयांमधील को-ब्रँडेड प्रिपेड प्रदान संलेख देण्यासाठी, बँकांना सर्वसामान्य परवानगी देण्यात आली आहे.

(7.5) <u>बँका, एनबीएफसी व इतर व्यक्तींद्वारे प्रिपेड गिफ्ट संलेख दिले जाणे</u>

बँका, एनबीएफसी व इतर व्यक्तींना, पुढील अटींवर, प्रिपेड गिफ्ट संलेख देण्यास परवानगी आहे.

(अ) प्रिपेड गिफ्ट संलेखाची कमाल वैधता एक वर्षाची असेल.
(ब) अशा प्रत्येक प्रदान संलेखाचे कमाल मूल्य रु.50,000/- पेक्षा अधिक नसावे.
(क) हे संलेख पुनर्भारित करता येणार नाहीत
(ड) अशा संलेखांसाठी रोख रक्कमेची निकासी करता येणार नाही.
(ई) असे संलेख खरेदी करणारांबाबत संपूर्ण केवायसी ठेवली जावी. (संपूर्ण केवायसी केलेल्या ग्राहकांच्या भारतात ठेवलेल्या खात्यात डेबिट करुन असे संलेख त्या ग्राहकांना देण्यासाठी वेगळ्या केवायसीची आवश्यकता नाही)
(फ) रोख देणारांनी, असे संलेख देण्यात आलेल्या व्यक्तींबाबतची माहिती, जपून ठेवावी आणि मागणी केल्यावर ती उपलब्ध करुन द्यावी. अंतिम लाभार्थींबाबतची माहिती, नियंत्रक किंवा सरकारने, मागणी/विनंती केल्यावर उपलब्ध करुन दिली जाईल, ह्याची खात्री संलेख देणाराने करुन घ्यावी.
(ग) एखाद्या ग्राहकाला द्यावयाच्या अशा संलेखांची संख्या, व्यवहारांच्या मर्यादा इत्यादि ठरविण्यासाठी, संस्थांनी, त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेला जोखीम आधारित दृष्टिकोन ठरवावा.

(7.6) <u>सरकार प्रायोजित योजनांच्या लाभार्थींना देण्यासाठी, बँकांनी, सरकारी संस्थांना दिलेले प्रिपेड संलेख</u>

सरकार प्रायोजित योजनांच्या लाभार्थींना देण्यासाठी, सरकारी संस्थांना प्रिपेड संलेख देण्यास, बँकांना पुढील अटींवर परवानगी आहे :-

(अ) लाभार्थींच्या ओळखीचे सत्यांकन करण्याची जबाबदारी ही, त्या सरकारी संस्थेचीच असेल.
(ब) हे प्रदान संलेख भारित/पुनर्भारित करणे हे केवळ, त्या सरकारी संस्थेने त्याच बँकेत ठेवलेल्या खात्यात डेबिट करुनच केले जाईल.
(क) अशा प्रत्येक प्रदान संलेखाचे कमाल मूल्य रु.50,000 पेक्षा अधिक असणार नाही.

(ड) तशी विनंती केली गेल्यास, अशा प्रदान संलेखांबाबतच्या निधीचे हस्तांतरण, त्या लाभार्थीच्या नियमित बँक खात्यात, बँकांद्वारे केले जाईल.

(ई) अशा संलेखांसंबंधीच्या ग्राहक सेवेच्या सर्व मुद्दयांसाठी बँका जबाबदार असतील

(7.7) <u>बँकांनी, इतर वित्तीय संस्थांना, ह्या संस्थांद्वारे त्यांच्या ग्राहकांना, एकदाच/नियतकालिक प्रदाने क्रेडिट करण्यासाठी दिलेले प्रिपेड संलेख</u>.

इतर वित्तीय संस्थांद्वारे, त्यांच्या ग्राहकांना, एकदाच/नियतकालिक प्रदाने क्रेडिट करण्यासाठी, अशा इतर संस्थांना प्रिपेड संलेख देण्यास, बँकांना पुढील अटींवर परवानगी आहे :-

(अ) असे संलेख देण्यापूर्वी, अशा संस्थांनी केवायसी पध्दतींचे अनुपालन योग्यप्रकारे केले असल्याची, बँकांनी खात्री करुन घ्यावी.

(ब) केवळ त्या वित्तीय संस्थेने, त्या बँकेत ठेवलेल्या खात्यात डेबिट करुनच असे प्रदान संलेख भारित/पुनर्भारित केले जावेत.

(क) अशा प्रत्येक प्रदान संलेखाचे कमाल मूल्य रु.50,000/- पेक्षा अधिक असू नये.

(ड) तशी विनंती केली गेल्यास, अशा प्रदान संलेखांबाबतच्या निधीचे हस्तांतरण, त्या लाभार्थीच्या नियमित बँक खात्यात, बँकांद्वारे केले जाईल.

(ई) अशा संलेखांसंबंधीच्या ग्राहक सेवेच्या सर्व मुद्दयांसाठी बँका जबाबदार असतील

(7.8) <u>सरहद्दी पलीकडून आवक झालेल्या प्रेषणांच्या क्रेडिटसाठी बँकांनी दिलेले प्रिपेड संलेख</u>

रिझर्व्ह बँकेच्या, धन हस्तांतरण सेवा योजना (एमटीएसएस) खाली, मंजुरी प्राप्त असलेल्या मुख्य एजंटांना, किंवा आवक प्रेषणांमधून आलेल्या निधीचे लोडिंग करण्याच्या योजनेखाली थेट लाभार्थींना, प्रिपेड संलेख देण्यास, बँकांना पुढील अटींवर परवानगी आहे.

(अ) असे प्रिपेड प्रदान संलेख थेट लाभार्थींना देतेवेळी, बँकांनी त्या लाभार्थीची सुयोग्य ओळख पटवून घ्यावी.

(ब) असे संलेख देण्यापूर्वी, बँकांनी, एजंटांनी लाभार्थींची ओळख पटविण्यासाठी अनुसरलेल्या प्रणाली बाबत स्वतःचे समाधान करुन घ्यावे.

(क) केवळ एमटीएसएसच्या मार्गदर्शक तत्वांनुसारच, प्रेषणाची रक्कम कार्डावर लोड केली जाईल.

(ड) अशा प्रत्येक प्रदान संलेखाचे कमाल मूल्य रु.50,000/- पेक्षा अधिक नसावे.

(ई) केवळ एकाच क्रेडिट रकमेचे निरनिराळ्या प्रदान-प्रकारांमध्ये विभाजन करण्यास परवानगी नाही. एमटीएसएसखाली, रु.50,000/- पेक्षा अधिक असलेली रक्कम, एखाद्या बँक-खात्यातील क्रेडिटनेच दिली जावी.

(फ) तशी मागणी केली गेल्यास, बँकांनी, अशा प्रदान संलेखामधील निधीचे हस्तांतरण लाभार्थींच्या खात्यात करावे.

(ग) अशा संलेखाबाबतच्या ग्राहक सेवेच्या सर्व बाबींसाठी बँक जबाबदार असेल.

(7.9) <u>बँकांनी, कॉर्पोरेट संस्थांना पुढे त्यांच्या कर्मचा-यांना देण्यासाठी दिलेले प्रिपेड संलेख</u>

पुढे त्यांच्या कर्मचा-यांना देण्यासाठी, कॉर्पोरेट्सना प्रिपेड संलेख देण्यास, पुढील अटींवर बँकांना परवानगी आहे.

(अ) केवळ भारतामधील कोणत्याही स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचिबध्द असलेल्या कॉर्पोरेट संस्थांनाच प्रिपेड प्रदान संलेख दिले जाऊ शकतात.

(ब) कर्मचा-यांच्या ओळखीचे सत्यांकन करण्याची जबाबदारी, संबंधित कॉर्पोरेटची असेल. कॉर्पोरेट संस्थेने कार्डे दिली असलेल्या त्यांच्या कर्मचा-यांच्या छायाचित्राची प्रत आणि ओळख-पुरावा ह्यासह, बँकांनी, त्या कर्मचा-यांची माहिती ठेवण्यासाठी, सुयोग्य प्रणाली ठेवाव्यात. त्याचप्रमाणे, कर्मचा-यांच्या बँक खात्यांची (असल्यास) माहितीही कॉर्पोरेट संस्थांनी बँकेला द्यावी.

(क) कॉर्पोरेट संस्थेच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या प्राधिकृत स्वाक्षरीकर्त्यांची यादी रेकॉर्डमध्ये ठेवली असल्याची खात्री बँकांनी करुन घ्यावी, आणि प्रिपेड प्रदान संलेखांचे लोडिंग/ॲक्टिवेटिंग करण्यासाठी, अशा प्राधिकृत व्यक्तींच्याच विनंत्यांचा स्वीकार करावा.

(ड) ह्या प्रिपेड प्रदान संलेखांचे लोडिंग/रिलोडिंग, त्या कॉर्पोरेट संस्थेने त्याच बँकेत ठेवलेल्या बँक खात्यात (संपूर्ण केवायसी केलेल्या) केवळ डेबिट करुनच करण्यात यावे.

(ई) वैय्यक्तिक प्रिपेड प्रदान संलेखावरील आऊटस्टँडिंग असलेले कमाल मूल्य, कोणत्याही वेळी रु.50,000/- पेक्षा अधिक असू नये.

(फ) तशी विनंती केली गेल्यास, अशा प्रिपेड प्रदान संलेखामधील निधी, संबंधित कर्मचा-याच्या नियमित बँक खात्यात हस्तांतरित करु शकतात.

(ग) ह्या संलेखासंबंधीच्या ग्राहकसेवेच्या सर्व बाबींसाठी बँकांच जबाबदार असतील.

(7.10) <u>अवलंबून असलेल्या व्यक्ती/कुटुंबातील सदस्यांसाठी असलेल्या, संपूर्ण केवायसी प्रक्रिया झालेल्या खात्यांमधून बँकांद्वारे अनेक पीपीआय दिले जाणे.</u>

पुढील अटींवर बँकांना प्रिपेड प्रदान संलेख देण्यासाठी परवानगी आहे.

(अ) खरेदीदारांच्या, संपूर्ण केवायसी केलेल्या खात्यांमधून मूल्याचे लोडिंग करुन असे पीपीआय दिले जाऊ शकतात.

(ब) पीपीआय खरेदी करणा-या खातेदारांनी, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या/कुटुंब सदस्य असलेल्या भावी/इच्छित लाभार्थींची किमान माहिती (नाव, पत्ता, संपर्क माहिती) देणे आवश्यक आहे.

(क) एका लाभार्थीला केवळ एकच कार्ड दिले जाईल.

(ड) वेळोवेळी दिल्या गेलेल्या डीएमटी मार्गदर्शक तत्वांखाली रोख-प्रदान व्यवस्थांसाठी लागु असलेल्या व्यवहार व मासिक मर्यादा (सध्या, रु.10,000/- प्रति व्यवहार व रु.25,000/- मासिक मर्यादा) अशा पीपीआयनाही लागु असतील.

(ई) अशा पीपीआयवर देखरेख ठेवण्यासाठी व त्याबाबतचे शंकास्पद व्यवहार फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट इंडिया (एफ आययु - आयएनडी) ह्यांना कळविण्यासाठी, बँका विशिष्ट यंत्रणा ठेवू शकतात.

(फ) ओपन सिस्टिम पीपीआयना लागु होणारी इतर मार्गदर्शक तत्वे कार्डांनाही लागु असतील.

(ग) असे पीपीआय केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरुपात दिले जातील.

(7.11) <u>भेट देणा-या विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्ती व एनआरआय ह्यांना बँकांनी, रुपये-वर्चस्वाचे दिलेले पीपीआय.</u>

रुपये-वर्चस्व असलेले व नॉन-रिलोडेबल पीपीआय पुढीलप्रमाणे देण्यास बँकांना परवानगी आहे. (अ) एनआरआय व भारताला भेट देणा-या विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तींना द्यावयाचे पीपीआय. (ब) एनआरआय व भारताला भेट देणा-या विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तींना द्यावयाचे, विनिमय गृहे/धन प्रेषक (आरबीआयद्वारा मंजुरीप्राप्त) ह्यांच्याबरोबर को-ब्रँडेड असलेले पीपीआय. परंतु ह्यासाठी पुढील अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

(अ) ही कार्डे, केवायसी निकषांचे पालन केले असलेल्या खात्यामधून लोडिंग करुन व रु.2 लाख एवढ्या कमाल रकमेपर्यंत, भारतामधील बँकांच्या शाखांद्वारे थेट किंवा विनिमय गृहे/धन पारेषकांबरोबर को-ब्रँडिंग करुन दिली जाऊ शकतात.

(ब) अशा पीपीआयचे कार्यान्वन (अॅक्टिवेशन), तो प्रवासी भारतात असल्यावरच बँकांद्वारे केले जावे.

(क) अशा पीपीआयने काढावयाची रोख रक्कम दरमहा रु.50,000/- पर्यंतच मर्यादित असावी.

(ड) अशी कार्डे केवळ भारतातच वापरण्यासाठी दिली जावीत आणि सर्व व्यवहार भारतीय रुपयांमध्येच केले जावेत.

(ई) वेळोवेळी, केवायसी/एएमएल/सीएफटी बाबतच्या आवश्यकतांचे पालन करण्यात आले असल्याची खात्री बँकांनी करुन घ्यावी.

(फ) एखादी व्यक्ती एका वेळी केवळ एकच कार्ड धारण करु शकते व ते कार्ड अ-हस्तांतरणीय असावे. ह्याबाबतची खातरजमा करण्यासाठी कार्ड देणा-या बँकेने आवश्यक त्या व्यवस्था ठेवाव्यात.

(ग) विद्यमान असलेल्या विदेशी मुद्रा विनियमांखाली परवानगी असलेल्या व्यवहारांसाठीच ह्या पीपीआयचा वापर केला जाऊ शकतो.

(ह) बँकांनी व्यवहारांचे अभिलेख ठेवणे आवश्यक आहे.

(आय) अशा पीपीआयबाबत, भारतात न वापरलेल्या त्यामधील रकमेच्या परताव्यासाठी बँकांनी ठेवलेली प्रक्रिया, विद्यमान असलेल्या विदेशी मुद्रा विनियमांनुसार असावी.

(ज) असे पीपीआय केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरुपातच दिले जावेत.

7.12 मास-ट्रान्झिट सिस्टिम्स साठी पीपीआय (पीपीआय-एमटीएस).

समाजात कमीत कमी रोखीचे व्यवहार केले जाण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रोख रक्कम आधारित प्रदानांकडून इलेक्ट्रॉनिक प्रदानाकडे जाण्याच्या प्रक्रियेमध्ये, पुढील लक्षणे असलेल्या सेमी-क्लोज्ड प्रिपेड प्रदान संलेखांचा (पीपीआय) एका प्रकाराची सुरुवात करण्यात आली आहे.

(1) हे सेमी-क्लोज्ड पीपीआय, प्रदान व तडजोड प्रणाली अधिनियम, 2007 खाली, अशा सेमी-क्लोज्ड पीपीआयचे प्रदान करण्यास व कार्यान्वन करण्यास प्राधिकृतता मिळालेल्या मास ट्रान्झिट सिस्टिम ऑपरेटर्सद्वारा (एमटीएस) दिले जातील.

(2) पीपीआय-एमटीएस म्हणून पात्र ठरण्यासाठी, अशा पीपीआय-एमटीएसमध्ये ट्रान्झिट सर्विस संबंधीचे ऑटोमेटेड फेअर कलेक्शन सिस्टिमचे अॅप्लिकेशन अवश्य समाविष्ट असेल.

(3) मास ट्रान्झिट सिस्टिम व्यतिरिक्त, असे पीपीआय-एमटीएस, त्या ट्रान्झिट सिस्टिमच्या आवाक्या/परिधी मध्ये केल्या जाणा-या किंवा संबंधित असलेल्या कार्यकृती करणा-या इतर व्यापा-यांकडेही वापरत येऊ शकतील.

(4) इतर कोणत्याही पीपीआय प्रचाकलाला लागु असलेल्या कार्यरीतीचे पालन करुन, पीपीआय-एमटीएस, व्यापा-यांचे (केवळ वरील (3) खाली मान्यताप्राप्त असलेले) ऑनबोर्डिंग केले असल्याची खात्री करुन घेईल.

(5) पीपीआय-एमटीएसची वैधता, दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांची असेल.

(6) अशा पीपीआयसाठी आवश्यक असलेल्या केवायसीचा स्तर प्रचालक स्वतःच ठरवू शकतो.

(7) देण्यात आलेले पीपीआय-एमटीएस पुनर् भरितक्षम स्वरुपाचे असू शकतात आणि कोणत्याही वेळी त्यांचे मूल्य/शिल्लक, रु.2,000/- (रुपये दोन हजार) पेक्षा अधिक नसावी.

(8) ह्या पीपीआयवर रोकडीकरण किंवा परतावा करण्यास परवानगी नाही.

(9) डोमेस्टिक मनी ट्रान्स्फर (डीएमटी) मार्गदर्शक तत्वांखालील निधी-हस्तांतरणे ह्या पीपीआयना लागु असणार नाही.

(10) पीपीआय देण्याबाबत लागु असलेल्या, एस्क्रो व्यवस्था, ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा, एजंट/व्यापारी ह्यांच्याबाबतचे श्रम, अहवाल देणे व एमआयएसच्या आवश्यकतांबाबत असलेली इतर विद्यमान मार्गदर्शक तत्वे, पीपीआय-एमटीएसलाही लागु असणे सुरुच राहील

**(8) गोळा केलेल्या पैशाचा विनियोग**

(8.1) प्रिपेड प्रदान संलेख देण्याविरुध्द गोळा केलेला पैसा, कोणत्याही वेळी, लक्षणीय असू शकतो. ह्याशिवाय निधीची उलाढालही जलद असली पाहिजे. प्रिपेड संलेख योजनांवरील जनतेचा व व्यापारी संस्थांचा विकास हा, खात्री/निश्चितता व अशा संलेखांच्या वापरामुळे निर्माण झालेल्या हक्क/दाव्यांची वेळोवेळी तडजोड ह्यावर अवलंबून आहे. वेळेवर तडजोड करण्याची खात्री करण्यासाठी, गोळा केलेला निधी, संलेख देणारांनी येथे दिल्यानुसार गुंतवावा.

(8.2) बँकांनी चालविलेल्या योजनांसाठी, आऊटस्टँडिंग शिल्लक ही, राखीव निधीच्या आवश्यकतांसाठी असलेल्या, नेट डिमांड अँड टाईम लायाबिलिटीज् चा एक भाग असेल. ही स्थिती, अहवाल पाठविण्याच्या तारखेस, त्या बँकेच्या लेखा-पुस्तकात दिसत असलेल्या शिल्लकांच्या आधारावर काढली जाईल.

(8.3) प्रदान संलेख देणा-या इतर अबँकीय व्यक्तींनी, त्यांच्या आऊटस्टँडिंग शिल्लक रकमा, पुढील अटींवर, कोणत्याही अनुसूचित वाणिज्य बँकेमधील एस्क्रो खात्यात ठेवणे आवश्यक आहे.

(1) असे एस्क्रो खाते, कोणत्याही वेळी, केवळ एकाच अनुसूचित वाणिज्य बँकेत ठेवले जाणे आवश्यक आहे.

(2) असे एस्क्रो खाते, एका बँकेतून दुस-या बँकेत हलविण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, व्यापा-यांना करावयाच्या प्रदान-चक्राला धक्का न लावता, ठरविलेल्या वेळेत, केले जावे. असे स्थानांतरण किमान शक्य कालावधीत व आरबीआयची मंजुरी घेऊन केले जावे.

(3) एस्क्रो खात्यातील शिल्लक, कोणत्याही वेळी, आऊटस्टँडिंग असलेल्या पीपीआयचे मूल्य व व्यापा-यांना द्यावयाचे प्रदान ह्यापेक्षा कमी असू नये. पीपीआय देणारांनी, शक्यतो, अंतिम उपभोक्त्यांना पीपीआय विकणे/रिलोड केल्यानंतर ताबडतोब, तो निधी एस्क्रोखात्यात क्रेडिट करण्याची खात्री करुन घेणे आवश्यक असले तरी, कोणत्याही परिस्थितीत, एस्क्रो खात्यात केलेले क्रेडिट, व्यवहाराच्या दिवसाच्या (पीपीआय विकल्याचा/रिलोड केल्याचा दिवस) समाप्तीपेक्षा अधिक विलंबाने असू नये.

(4) एस्क्रो खात्यात ठेवलेल्या ह्या रकमेचा उपयोग, भाग घेणा-या व्यापारी संस्थांना व इतर मंजुरीप्राप्त प्रदाने करण्यासाठी केला जाईल. एस्क्रो खात्यासाठी, केवळ पुढील क्रेडिट्स व डेबिट्स करण्यास परवानगी असेल.

***क्रेडिट्स***

(अ) एजंटांच्या ठिकाणांसह, पीपीआयची विक्री/रिलोड करण्यातून मिळालेली प्रदाने

(ब) अयशस्वी/वादग्रस्त/परत केलेल्या/रद्द केलेल्या व्यवहारांसाठी मिळालेले परतावे.

***डेबिट्स***

(क) निरनिराळ्या व्यापा-यांना/सेवा देणारांना, त्यांच्याकडून आलेल्या दाव्यांच्या भरपाईसाठी केलेली प्रदाने.

(ड) आरबीआयने वेळोवेळी परवानगी दिल्यानुसार, पीपीआय धारकांकडून मिळालेल्या निधी हस्तांतरण सूचनांवर प्रक्रिया करण्यासाठी प्रायोजक बँकेला प्रदान

(ई) लागु असलेल्या सरकारी करांसाठी (खरेदीदारांकडून पीपीआयची विक्री/रिलोड रकमेसोबत मिळालेली रक्कम) प्रदान

(फ) पीपीआयचे लोडिंग/रिलोडिंग चुकीचे झाले असल्यास किंवा फसवणुक करुन झाले असल्यास (चुकीचे हस्तांतरण/फसवणुक झाल्याचे सिध्द झाल्यावर), एखाद्या पीपीआयमधील व्यवहार रद्द झाल्यामुळे केलेला परतावा. हे निधी जेथून मिळाले होते त्याच स्त्रोतामध्ये परत क्रेडिट करावयाचे आहेत. हे निधी, त्या प्रकरणाची वासलात/निर्णय लागेपर्यंत जप्त करावयाचे नाहीत.

(ग) पीपीआयचा व्यवसाय करत असताना, पीपीआय देणाराला येणे असलेले इतर प्रदान (उदा. सेवा आकार, जप्त केलेली रक्कम, दलाली).

(ह) नियंत्रक/कोर्ट/कायदा अंमलबजावणी एजन्सीद्वारा निर्देशित अन्य डेबिट.

**सूचना** : (1) सेवा आकार, दलाली, व जप्त केलेली रक्कम ह्यांच्यासाठी केलेले प्रदान पूर्व-नियोजित दराने/वारंवार ते केले जाईल. अशी हस्तांतरणे, जेथे एस्क्रो खाते ठेवले आहे त्या बँकेबरोबर केलेल्या करारनाम्यात दर्शविल्यानुसार केवळ, एका नेमलेल्या बँकेमधील, पीपीआय देणाराच्या खात्यातच केली जातील. (2) ह्या सर्व तरतुदी पीपीआय देणारा व एक्रो खाते ठेवणारी बँक, ह्यांच्या दरम्यान केलेल्या सेवा स्तरीय करारनाम्याचा एक भाग म्हणून असाव्यात.

(5) पीपीआय देणाराने, त्याने मिळविलेल्या व्यापा-यांची यादी बँकेला देऊन ती वेळोवेळी अद्यावत करणे आवश्यक आहे. बँकेने खात्री करणे आवश्यक आहे की, केवळ पात्र असलेल्या व्यापा-यांना/हेतूंसाठीच प्रदान करण्यात येत आहे. केवळ वरील उद्देशासाठीच, एस्क्रो खाते ठेवणारी बँक आणि पीपीआय देणा-याच्या दरम्यान केलेल्या करारनाम्यामध्ये एक विशेष कलम/खंड टाकला जावा.

(6) ह्याशिवाय, पीपीआय देणारा/चालविणारा आणि एस्क्रो खाते ठेवणारी बँक ह्यांच्या दरम्यान केलेल्या करार नाम्यात, असेही एक विशेष कलम असावे, की त्यामुळे, पीपीआय देणा-याने व्यवसाय बंद केल्यास/नादार झाल्यास, एस्क्रो खात्यातील पैसा, इतर धनकोंपेक्षा, केवळ व्यापा-यांना/धारकांनाच दिला जाईल. त्यानुसार, एस्क्रो खाते चालविण्यासाठी, प्रिपेड प्रदान संलेख देणारा/चालविणारा बरोबर केलेल्या करारनाम्यामध्ये, पुढील परिच्छेद घालावा, असे सर्व बँकांना सांगण्यात येत आहे :

*“येथे स्पष्टपणे सहमती देऊन दुजोरा देण्यात येत आहे की, एस्क्रो खात्यात असलेली रक्कम ही प्रिपेड प्रदान संलेख किंवा अन्यथा निर्माण झालेल्या थकबाकीचे (ड्युज) प्रदान करण्यासाठी, प्रिपेड प्रदान संलेख धारकांसाठी व व्यापारी संस्थांसाठी ठेवलेली आहे. मात्र, ह्याशिवाय एस्क्रो खात्यात असलेली रक्कम ही, सहभागी व्यापारी संस्था किंवा प्रचालकाने दिलेल्या प्रिपेड प्रदान संलेख धारकांसाठी एक प्रतिभूती/सुरक्षा ठेव म्हणून समजली जाईल, आणि सर्व प्रथमतः, अशा प्रिपेड संलेखांच्या उपयोगांमुळे निर्माण झालेली थकबाकी परत मिळविण्यास, किंवा अन्यथा, ते संलेख सादर केल्यावर त्यांच्या धारकांना प्रदान करण्यास, आणि ती योजना गुंडाळली गेल्यावर, किंवा रिझर्व्ह बँकेने ती खंडित करण्यास सांगितल्यानंतर, (रिझर्व्ह बँकेने, एप्रिल 27, 2009 रोजी दिलेल्या, वेळोवेळी सुधारित केलेल्या, प्रिपेड प्रदान संलेख देणे व चलित करणे ह्यावरील कार्यकारी मार्गदर्शक तत्वांमध्ये दिल्यानुसार) थकबाकीची तडजोड करण्यास वापरली जाईल”*

(7) वरीलप्रमाणे एस्क्रो खाते ठेवणा-या बँकांना ह्यासाठी सांगण्यात येते की, त्यांनी कंपनीज अधिनियम, 1956 च्या कलम 125 खाली रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् ह्यांचेकडे, प्रिपेड प्रदान संलेखांच्या धारकांचा, आणि/किंवा व्यापारी संस्थांचा हक्क/मालकी (चार्ज) नोंदवून ठेवावा.

(8) ह्या बँकेने वेळोवेळी विहित केल्यानुसार, ऑडिटरांनी सही केलेले प्रमाणपत्र, प्राधिकृत संस्थांनी, तिमाही धर्तीवर सादर करणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या प्रिपेड प्रदान संलेखांचे आऊटस्टँडिंग मूल्य समाविष्ट करण्यासाठी पुरेशी शिल्लक, त्या व्यक्तीकडून ठेवण्यात आली आहे असे प्रमाणित करणारे प्रमाणपत्र सादर केले जावे. संबंधित तिमाहीच्या समाप्तीनंतर एक पंधरवड्याच्या आत ही प्रमाणपत्रे सादर केली जावीत. ह्या प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

(9) संस्थेच्या लेखा वर्षाशी जुळणारे, वरीलप्रमाणे एक वार्षिक प्रमाणपत्रही, त्या व्यक्तीद्वारे रिझर्व्ह बँकेला सादर केले जावे.

(10) आऊटस्टँडिंग असलेल्या संलेखांचे मूल्य व त्याच्या तुलनेने बँकांमधील एस्क्रो खात्यात ठेवलेल्या शिल्लक रकमा ह्यांची दैनंदिन स्थिती दर्शविणारे योग्य रेकॉर्ड, रिझर्व्ह बँकेच्या किंवा खाते ठेवले असलेल्या बँकेच्या छाननीसाठी, मागणी केली गेल्यास, उपलब्ध करुन द्यावे.

(11) व्यापा-यांबरोबर करावयाची निधी तडजोड, पीपीआय देणाराने केलेल्या (असल्यास) इतर व्यवहारांमध्ये मिसळण्यात येऊ नये.

(12) अशा शिल्लक रकमांवर बँकेद्वारा कोणतेही व्याज दिले जाणार **नाही**.

8.4 वरील (8.3, 12) ला अपवाद म्हणून, ती संस्था, एस्क्रो खाते ठेवलेल्या बँकेबरोबर करार करु शकते की, एस्क्रो खात्यातील रकमेचा “कोअर भाग”, व्याज देय असलेल्या वेगळ्या खात्यात हस्तांतरित केला जावा. मात्र त्यासाठी पुढील अटी आहेत :-

(1) आवश्यक ते कागदपत्र तपासल्यानंतर, ठेवलेली रक्कम ही “कोअर भाग”च करा असल्याबाबत त्या बँकेने समाधान करुन घ्यावे.

(2) ही रक्कम, एस्क्रो खात्याशीच जोडलेली असेल - म्हणजे, एस्क्रो खात्यातील रक्कम, त्या संस्थेच्या प्रदान आवश्यकतांसाठी कमी पडत असल्यास, व्याज-देय खात्यात ठेवलेल्या रकमा त्या बँकेला उपलब्ध होतील.

(3) किमान एक वर्ष व्यवसाय करणा-या, आणि संपूर्ण लेखा-वर्षासाठी लेखा-परीक्षण केले गेले असलेल्या व्यक्तींसाठीच ही सुविधा देण्यास परवानगी आहे.

(4) अशा ठेवींविरुध्द कोणतेही कर्ज घेण्यास परवानगी नाही. अशा प्रकारच्या ठेवींबाबत बँका कोणतीही ठेव-पावती देणार नाहीत किंवा ठेवी-रकमांबाबत कोणतेही लिएन ठेवणार नाहीत.

(5) वरीलप्रमाणे काढलेला "कोअर भाग" एस्क्रो खात्याशीच जोडलेला राहील. रिझर्व्ह बँकेला सादर करावयाच्या, ऑडिटरने दिलेल्या, तिमाही व वार्षिक प्रमाणपत्रांमध्ये ठेवलेली एस्क्रो शिल्लक व कोअर स्पष्टपणे दर्शविले जावेत.

**सूचना :** ह्या मार्गदर्शक तत्वांसाठी, "कोअर भाग" पुढीलप्रमाणे काढला जावा.

पायरी 1 : मागील महिन्यापासून, एक वर्षासाठी (26 पक्ष) पाक्षिक (एफएन) धर्तीवरील, किमान दैनिक आऊटस्टँडिंग बॅलन्स (एलबी) काढा.

पायरी 2 : अशा किमान पाक्षिक आऊटस्टँडिंग शिल्लकांची सरासरी काढा [(एफएन1 चा एलबी1 + एफएन2 चा एलबी2 + . . . . . + एफएन26 चा एलबी26) भागिले 26].

पायरी 3 : अशा रितीने काढलेली सरासरी शिल्लक म्हणजे, व्याज मिळविण्यास पात्र असलेला "कोअर भाग".

**(9) प्रिपेड प्रदान संलेख देणे व रिलोड करणे**

(9.1) रिझर्व्ह बँकेद्वारे प्रिपेड प्रदान संलेख देण्यास प्राधिकृत केलेल्या सर्व व्यक्तींना, पीपीआयच्या परवानगीप्राप्त वर्गावर अवलंबून, रिलोडेबल किंवा नॉन-रिलोडेबल प्रिपेड प्रदान संलेख देण्याची परवानगी आहे.

(9.2) रोख रक्कम/बँक खात्यात डेबिट करुन/क्रेडिट कार्ड द्वारे प्रदान करुन किंवा रिझर्व्ह बँकेने ह्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार नेमलेल्या व्यवसाय सहयोगींमार्फत, बँकांना, त्यांच्या शाखांमध्ये किंवा एटीएममध्ये, असे प्रिपेड प्रदान संलेख देण्यास व रिलोड करण्यास परवानगी आहे. रोख रक्कम/बँक खात्यात डेबिट करुन/क्रेडिट कार्ड द्वारे प्रदान करुन एजंटांमार्फत (बीसी सोडून अन्य), बँकांना, सेमी-क्लोज्ड प्रिपेड प्रदान संलेख देण्यास व रिलोड करण्यास परवानगी आहे. मात्र त्यासाठी पुढील अटी आहेत -

(1) अशा संलेखांची विक्री करण्यासाठी नेमणुक करण्यापूर्वी प्रचालकाने त्या व्यक्तींबाबत योग्य ड्यु-डिलिजन्सची प्रक्रिया केली असावी.

(2) अशा एजंटांद्वारे दिल्या गेलेल्या सर्व प्रदान संलेखांसाठी तो प्रचालक जबाबदार असेल.

(3) अशा एजंटांच्या चूक-भूलीबाबत, प्रिपेड प्रदान संलेख देणारेच मुख्य जबाबदार असतील.

9.3 इतर व्यक्तींनाही, रोख रक्कम/बँक खात्यात डेबिट करुन/क्रेडिट कार्ड द्वारे प्रदान करुन, त्यांच्या प्राधिकृत आऊटलेडसमार्फत किंवा एजंटांमार्फत, असे प्रदान संलेख देण्यास व रिलोड करण्यास परवानगी आहे. त्यासाठी पुढील अटी आहेत.

(1) अशा संलेखांची विक्री करण्यासाठी, प्राधिकृत एजंट म्हणून नेमणुक करण्यापूर्वी, प्रचालकाने, त्या व्यक्तींबाबत योग्य ड्यु-डिलिजन्स प्रक्रिया केली असावी.

(2) अशा एजंटांद्वारे दिल्या गेलेल्या सर्व प्रदान संलेखांसाठी तो प्रचालक जबाबदार असेल.

(3) अशा एजंटांच्या चूक-भूलीबाबत, प्रिपेड प्रदान संलेख देणारेच मुख्य जबाबदार असतील

**(10) वैधता**

10.1 ह्या देशात दिल्या गेलेल्या सर्व प्रिपेड संलेखांचा किमान वैधताकाल, धारकाला दिल्याच्या/ॲक्टिवेट केल्याच्या तारखेपासून सहा महिने असेल.

10.2 नॉन रिलोडेबल प्रिपेड प्रदान संलेखांच्या बाबतीत, प्रदान संलेखाच्या समाप्तीचे वेळी आऊटस्टँडिंग रकमेचे हस्तांतरण, धारकाने त्याच प्रचालकाकडून विकत घेतलेल्या नव्या व तशाच प्रकारच्या प्रदान संलेखांमध्ये करण्यास परवानगी दिली जावी.

10.3 पीपीआयमधील आऊटस्टँडिंग शिल्लका जप्त करण्यापूर्वी, पीपीआयचा वैधताकाल संपण्यापूर्वीच्या 30 दिवसांच्या कालावधीत, वाजवी अंतराने, पीपीआयने, पीपीआयधारकाला त्याबाबत इशारा द्यावा. असा इशारा, एसएमएस/ई-मेल/पोस्टाने, किंवा ग्राहक होतेवेळी (पीपीआयच्या विक्रीचे वेळी) धारकाने निर्देशित केलेल्या/पसंती दिलेल्या भाषेमध्ये पोस्टाने किंवा अन्य रितीने पाठविला जावा. ह्याशिवाय, समाप्तीकाल तसेच जप्तीबाबतच्या धोरणाची माहिती, त्या ग्राहकाला, पीपीआयची विक्री/रिलोड करतेवेळीच सांगितली जावी आणि पीपीआयच्या विक्रीच्या अटी व शर्तींमध्ये स्पष्टपणे निर्देशित केली जावी. लागु असेल तेथे, ही माहिती प्रचालकाच्या वेबसाईटवरही स्पष्टपणे दिली जावी.

**(11) व्यवहार-मर्यादा**

11.1 पीपीआयचा वापर करताना, माल व सेवा विकत घेण्यावर कोणतीही वेगळी मर्यादा घालण्यात आलेली नाही, आणि पीपीआय धारकाला, पीपीआयच्या, लागु असलेल्या, सर्व-समावेशक मर्यादेमध्ये, ह्या कामासाठी पीपीआयचा उपयोग करण्यास परवानगी आहे.

11.2 तथापि, देशांतर्गत धन हस्तांतरण (डीएमटी) मार्गदर्शक तत्वांखाली परवानगी प्राप्त असलेल्या निधी-हस्तांतरणावर, व्यवहार मर्यादा व मासिक कॅप्स लागु आहेत. पीपीआय देणारांनी खात्री करुन घ्यावी की, डीएमटीखाली एखाद्या पीपीआयकडे येणारे सर्व निधी, पीपीआयच्या त्या वर्गासाठी असलेल्या सर्व समावेशक परवानगीप्राप्त मर्यादांमध्येच आहे.

11.3 अयशस्वी झालेल्या/परत आलेल्या/रद्द केलेल्या व्यवहारांचे परतावे, संबंधित पीपीआय खात्यांना ताबडतोब लागु करावेत - मग असे निधी लागु केल्यामुळे त्या प्रकारच्या पीपीआयसाठी विहित केलेल्या मर्यादांचे उल्लंघन झाले तरी चालेल. तथापि, पीपीआय देणारांनी, असे परत आलेले/परतावे बाबतची संपूर्ण माहिती जपून ठेवावी, आणि ती

मागितली जाईल तेव्हा, उपलब्ध करावी. ह्याशिवाय, विशिष्ट खात्यांमध्ये वारंवार होणा-या परताव्यांवर देखरेख ठेवण्यासाठी आवश्यक अशी प्रणालीही, पीपीआय देणारांनी तयार करावी. आणि आवश्यकता असल्यास/मागणी केल्यास, नियंत्रकाला लेखा परीक्षण करण्यासाठी, पुराव्यासह सादर करावी.

11.4 भारतामधील बँकांनी दिलेल्या, ओपन सिस्टिम प्रिपेड प्रदान संलेखांबाबत, पीओएसमध्ये प्रतिदिन रु.1,000/- च्या मर्यादेपर्यंतची रोकड काढण्यास परवानगी आहे, आणि त्यासाठी, डेबिट कर्जासाठी (पीओएसमध्ये रोकड काढण्यासाठी) लागु असलेल्या अटी लागु होतील.

**12. विमोचन**

12.1 त्या संलेखाखाली पुरेशी शिल्लक रक्कम असल्यास, असे संलेख देणारांनी, मंजुरीप्राप्त जागी, प्रदान/हस्तांतरणाबाबतच्या ग्राहकांच्या सूचना फेटाळू नयेत.

12.2 कोणत्याही कारणाने ती योजना गुंडाळली गेल्यास, किंवा खंडित करण्याबाबत रिझर्व्ह बँकेने निदेश दिल्यास, प्रिपेड प्रदान संलेखांच्या धारकांना, शिल्लक असलेल्या रकमेचे, समाप्ती-तारखेपूर्वी, विमोचन करण्यास परवानगी आहे.

12.3 वरील 10.2 मध्ये दिल्यानुसार विमोचन उपलब्ध करुन दिली आहे तेथे, विमोचनाचे मूल्य, शिल्लक रकमेपेक्षा किंवा दर्शनी मूल्यापेक्षा (लोडिंग मर्यादा) अधिक असणार नाही.

**13. फसवणुक टाळणे व सुरक्षा मानके**

13.1 फसवणुकी टाळण्यासाठी व शोधून काढण्यासाठी, प्रिपेड प्रदान संलेख देणारांनी, सुयोग्य अशा, माहिती व डेटा सिक्युरिटी इन्फ्रास्ट्रक्चर व प्रणाली तयार कराव्यात. निरनिराळ्या ठिकाणांमधून अनेक प्रदान संलेखांची खरेदी केली जाणे टाळण्यासाठी (अशा संलेखांसाठी विहित केलेल्या मर्यादांचे उल्लंघन टाळण्यासाठी), प्रचालकांद्वारे, एखादी केंद्रीय डेटाबेस/एमआयएस प्रणाली ठेवली जाणे आवश्यक आहे.

**14 ग्राहक संरक्षणाबाबतचे प्रश्न**

14.1 संलेख देतेवेळी, प्रिपेड प्रदान संलेख देणा-या सर्व प्रचालकांनी, धारकांना समजेल अशा स्पष्ट व सोप्या भाषेत (शक्यतो इंग्रजी, हिंदी व स्थानिक भाषेत) महत्वाच्या अटी व शर्ती कराव्यात. ह्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे.

(1) संलेखाच्या वापराशी निगडित असलेले सर्व आकार व शुल्के

(2) समाप्तीचा कालावधी आणि संलेखांच्या समाप्ती संबंधीच्या अटी व शर्ती

(3) ग्राहक सेवेबाबतचे टेलिफोन नंबर आणि वेबसाईट युआरएल.

14.2 अबँकीय पीपीआय देणारांनी, ग्राहक तक्रार निवारण व त्याच्याही वरच्या स्तरावर जाण्याच्या रीती ह्यासह एक परिणामकारक यंत्रणा तयार करावी आणि ती ग्राहकांच्या फायद्यासाठी प्रसिध्द करावी. आधीच अपरिहार्य केलेल्या नमुन्यात व वारंवारतेत ग्राहकांच्या तक्रारी कळविण्याव्यतिरिक्त, त्यांनी दिलेल्या पीपीआयसंबंधीच्या फसवणुकी (असल्यास) तिमाही धर्तीवर (किंवा त्यापूर्वी), पीपीआय देणारांनी कळविणे आवश्यक आहे. फसवणुकीच्या घटना व त्यामागील फसवणुक करणारांनी अवलंबिलेल्या रीती (कळल्यास व त्यांचे विश्लेषण केले असल्यास) वेगळ्याने कळविल्या जाव्यात.

14.3 बँकांद्वारे दिल्या गेलेल्या प्रिपेड प्रदान संलेखांबाबत ग्राहक तक्रार निवारणासाठी, बँकिंग ऑंबडसमनकडे (लोकपाल) जाऊ शकतात.

## एस्क्रो खात्यातील शिल्लकेबाबत ऑडिटरने द्यावयाचे तिमाही प्रमाणपत्र

| अनुक्रमांक | बाबी | | ऑडिटर कडून कमेंट |
|---|---|---|---|
| 1 | संस्थेचे नाव, पत्ता | | |
| 2 | ऑडिटरचे नाव व पत्ता | | |
| 3 | एस्क्रो बँकेचा तपशील | बँकेचे नाव<br>शाखेचा पत्ता<br>खाते क्रमांक इत्यादि | |
| 4 | तिमाहीच्या सुरुवातीस संस्थेची आऊटस्टँडिंग जबाबदारी | | रु. |
| 5 | तिमाही दरम्यान एस्क्रो खात्यातील डेबिट्स | | |
| | (आय) निरनिराळ्या व्यापा-यांना/सेवा देणारांना, त्यांच्याकडून आलेल्या दाव्यांविरुध्द केलेले प्रदान<br>जे) रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी विहित केल्यानुसार, पीपीआय धारकांकडून मिळालेल्या निधी हस्तांतरण सूचनांवर प्रक्रिया करण्यासाठी, प्रायोजक बँकेला केलेले प्रदान<br>(के) लागु असलेल्या सरकारी करांसाठी प्रदान<br>(ल) पीपीआयचे लोडिंग/रिलोडिंग चुकीने किंवा फसवणुकीने केले गेले असल्यास दिलेला परतावा<br>(म) पीपीआय व्यवहार नेहमीसारखा केला जात असताना, पीपीआय देणाराला देय असलेले इतर प्रदान<br>(न) नियंत्रक/कोर्ट/कायदा अंमलबजावणी एजन्सी द्वारा निदेशित केलेले अन्य डेबिट | | रु.<br>रु.<br>रु.<br>रु.<br>रु.<br>रु. |
| 6 | तिमाही दरम्यान एस्क्रो खात्यातील क्रेडिट | | |
| | (अ) एजंटांच्या ठिकाणांसह, पीपीआयची विक्री/रिलोडिंग मिळालेले प्रदान<br>(ब) अयशस्वी झालेल्या/वादग्रस्त/परत केलेल्या/रद्द झालेल्या व्यवहारांसाठी मिळालेला परतावा | | रु.<br>रु. |
| 7 | तिमाहीच्या शेवटी असलेली एस्क्रो शिल्लक | | |
| 8 | त्या संस्थेचे, दैनंदिन धर्तीवरील आऊटस्टँडिंग दायित्व भागविण्यास, एस्क्रो खात्यात पुरेशी शिल्लक होती काय ?<br>नाही असल्यास,<br>(1) तुटीची शिल्लक असलेल्या दिवसांची संख्या<br>(2) एस्क्रो खात्यातील तुटीची रक्कम | | |
| 9 | (1) तिमाही दरम्यान एस्क्रो खात्यामधील किमान शिल्लक (कोअरपोर्शनसह)<br>(2) तिमाही दरम्यान एस्क्रो खात्यामधील कमाल | | |

| | | |
|---|---|---|
| | शिल्लक (कोअरपोर्शनसह) | |
| 10 | एस्क्रो शिल्लकेचा कोअर भाग त्याच बँकेत ठेवला जात आहे काय ? | |
| 11 | कोअर शिल्लकेची तिमाही सरासरी | |
| 12 | त्या संस्थेकडून कोअर शिल्लकेवर व्याज मिळविले जात आहे काय | |
| 13 | प्रदानांसाठी पंजीकृत केलेली सभासदांची संख्या<br>(अ) तिमाहीच्या सुरुवातीस<br>(ब) तिमाहीच्या अखेरीस. | |

इतर माहिती :- व्यापा-यांना प्रदान करण्यासाठी लागलेला सरासरी वेळ

केलेल्या एकूण प्रदानांमधील निधी हस्तांतरणाचा भाग

**परिशिष्ट**

**<u>ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी</u>**

| अनु क्र. | परिपत्रक क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| 1. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.1873/02.14.06/2008-09 | 27.04.2009 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 2. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र. 344/02.14.06/2009-10 | 14.08.2009 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे |
| 3. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.1041/02.14.006/2010-2011. | 04.11.2010 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 4. | डीपीएसएस.क्र. 2174/02.14.004/2010-2011 | 23.03.2011 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे |
| 5. | डीपीएसएस.सीओ.क्र. 2501/02.14.06/2010-11 | 04.05.2011 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 6. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.225/02.14.006/2011-12 | 04.08.2011 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 7. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.62/02.27.019/2011-2012 | 05.10.2011 | देशांतर्गत धन हस्तांतरण शिथिलीकरण |
| 8. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.2256/02.14.006/ 2011-12 | 14.06.2012 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 9. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.560/02.14.006/2012-13 | 01.10.2012 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख देणे व चालविण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 10. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.563/02.14.003/2013-14 | 05.09.2013 | विक्रीच्या ठिकाणी (पीओएस) रोख रक्कम काढणे - बँकांनी दिलेले प्रिपेड प्रदान संलेख. |
| 11. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.2074/02.14.006/2013-14 | 28.03.2014 | भारतामधील प्रिपेड प्रदान संलेख एकत्रिकृत सुधारित धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे |
| 12. | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र.2366/02.14.006/2013-14 | 13.05.2014 | भारतामधील प्रिपेड प्रदान संलेख एकत्रिकृत सुधारित धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |
| 13 | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र 980/02.14.006/2013-14 | 03.12.2014 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख (पीपीआय) देणे व त्याची कार्यरीत- शिथिलीकरणे. |
| 14 | डीपीएसएस.सीओ.पीडी.क्र. 58/02.14.006/2015-2016 | 09.07.2015 | भारतामध्ये प्रिपेड प्रदान संलेख (पीपीआय) देणे व त्याची कार्यरीत - मास ट्रांझिट प्रणाली (पीपीआय-एमटीएस) साठी नवीन पीपीआय वर्गाची ओळख |